
ISBN : 978-93-88732-09-3



# अण्णा भाऊ साठे : समताधिष्ठित समाज व्यवस्थेचे तत्वज्ञ

संपादक

विठ्ठल गुडे

नवनाथ पवळे

दयाराम मस्के

ISBN : 978-93-88732-09-3

# अण्णा भाऊ साठे : समताधिष्ठित समाजव्यवस्थेचे तत्वज्ञ

संपादक

प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे

डॉ. विठ्ठल सखाराम जाधव

दयाराम मस्के

Shaurya Publication, Latur

## DECLARATION BY THE PUBLISHER

**ISBN : 978-93-88732-09-3**

संपादक

प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे

डॉ. विठ्ठल सखाराम जाधव

दयाराम मस्के

**Publication**

Shaurya Publication

Khadgao Road, Kapil Nagar, Latur-413512

Email-hitechresearch11@gmail.com

**Printing**

Shaurya Offset, MIDC, Latur

**First Edtion – 14th** Dec. 2019

**Note :-**Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from **prof. Navnath Pawale and Dr. Vitthal**

ISBN : 978-93-88732-09-3

| | | |
|---|---|---|
| 14. | अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य व कार्यांचा आढावा<br>डॉ. पी.बी. सिरसट | 76 |
| 15. | "म.अण्णाभाऊ माठे यांच्या जीवन कार्य आणि माहित्यातील राजकीय विचार : एक चिकित्मक अभ्याम"<br>प्रा. डॉ. पांडुरंग रामराव मुतार, | 80 |
| 16. | अण्णाभाऊ साठे :मानवतावादी साहित्यिक<br>प्रा.डॉ.प्रधान रामकृष्ण ज्योतिबा | 90 |
| 17. | आण्णाभाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक<br>प्रा.प्रज्ञा काशिनाथ कांबळे. शिरगांवकर. | 95 |
| 18. | अण्णाभाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय<br>प्रा.डॉ. प्रेमला मुखेडकर | 102 |
| 19. | उपेक्षित कॉम्रेड अण्णाभाऊ साठे<br>प्रा.राजेश अनंतराव कांबळे | 108 |
| 20. | "अण्णाभाऊ साठे : जीवन, साहित्य आणि कार्ये"<br>प्रा.पाटील वंदना सांडुराव | 112 |
| 21. | अण्णाभाऊसाठे जिवन साहीत्य आणि कार्य<br>प्रा. गायकवाड राहुल मारोतीराव | 117 |
| 22. | अणाभाऊ साठे के कथासाहित्य में विद्रोहीस्वर<br>डॉ.राजश्री दगडू भामरे | 120 |
| 23. | मामाजिकतेला कलात्मक रूप देणारा माहित्यसम्राट : अण्णा भाऊ साठे<br>प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे | 126 |
| 24. | अण्णाभाऊ साठे : एक अनुभवाचे विद्यापीठ<br>प्रा.डॉ. राठोड बी.जे. | 131 |
| 25. | अण्णाभाऊ साठे समताधिष्ठित समाज व्यवस्थेचे तत्वज्ञान<br>प्रा. डॉ. रेखा मुळे | 135 |
| 26. | आण्णाभाऊ साठे जीवन, साहित्य आणि कार्य<br>प्रा.डॉ.रेणुका सुनिल भावसार (बडवणे), | 138 |
| 27. | अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय<br>प्रा.डॉ.महदेव विलासराव रमाळ | 142 |

ISBN : 978-93-88732-09-3

# अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय

**प्रा.डॉ.सहदेव विलासराव रसाळ**

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग , व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

---

<u>प्रास्ताविक :-</u>

मराठी अक्षर वाङ्मयात अण्णा भाऊ साठे हे नाव मोठ्या सन्मानाने घ्यावेच लागेल.एवढी उत्तुंग प्रतिभा त्यांच्या साहित्यात सापडते. साहित्यसम्राट या उपाधीला सन्मान प्राप्त करून देणारे अण्णाभाऊंचे साहित्य होते. साहित्यातील बहुविध साहित्य प्रकार हाताळणारे व त्यातून समाजातील सर्वच स्तरातील माणसांना नायकत्व बहाल करणारे साहित्यातील महानायक अण्णा भाऊ साठे होते, हे आपणास मान्य करावेच लागेल. जीवन जगत असताना असंख्य यातनांचा सामना करताना सहन करावी लागलेली भयंकर वेदना त्यांच्या साहित्यातून मोठ्या संयमी पध्दतीने अवतरते. हे मोठेपण त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. आपण ज्या परिसरात जन्मलो, वाढलो त्या परिसराविषयी कमालीचे प्रेम आणि आस्था अण्णा भाऊंना होती. याचा जाज्वल्य प्रत्यय त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीतून येतो.

अण्णा भाऊ साठे आयुष्यभर वेदनांचा अंगार पचवत राहिले. तरीही जगण्याविषयीची कोणतीही तक्रार कधी केली नाही. जन्मतःच दारिद्र्यवाट्याला आले, त्याने आयुष्यभर अण्णा भाऊंची साथ सोडली नाही. दारिद्र्यावर विजय मिळवण्यासाठी कधीच स्वाभिमान गहाण ठेवला नाही. आपल्या साहित्यातून भाकरीसाठी लढणारा नायक अण्णाभाऊंनी उभा केला. शेवटच्या वर्गातील माणसे त्यांच्या साहित्यातील नायक आहेत. त्यांनी आपल्या साहित्यातून जे पाहिले होते, अनुभवले होते तेच प्रामाणिकपणे मांडलेले आहे.

अण्णा भाऊ साठे हे व्यवस्थेने दलित म्हणून नाकरलेल्या समुदायातील मातंग समाजात जन्मलेले होते. त्यामुळे जन्मगाव असलेल्या वाटेगाव पासून ते कर्मभूमी असलेल्या मुंबईपर्यंत त्यांना दलित असल्याचे चटके भोगावे लागले. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या वाङ्मयातही उमटलेले दिसते. त्यांचे साहित्य वेदनेत होरपळणाऱ्या माणसांचा वेध घेणारे साहित्य आहे. ग्रामीण भागातील, वेशीतील, वेशीबाहेरील, भटके-विमुक्त, शहरी, महानगरीय कामगार, झोपडपट्टीतील ही सर्व माणसे अण्णा भाऊंच्या साहित्यातून नायक म्हणून साकार होतात. हेच त्यांच्या वाङ्मयाचे वेगळेपण ठरते.

<u>अण्णा भाऊ साठे यांची पार्श्वभूमी :-</u>

अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्वीच्या इतिहासाचा वेध घेत असताना तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थितीचा विचार करणे आवश्यक ठरते. प्राचीन काळापासून भारतीय समाजात जातीव्यवस्था खोलवर रुजलेली होती. त्यात

ISBN : 978-93-88732-09-3

प्रामुख्याने चार वर्ण मानले गेले होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा पद्धतीने समाज विभागला गेला होता. त्यातील शुद्र मानल्या गेलेल्या जातीपैकी 'मांग' या जातीत अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला होता.

अण्णा भाऊ साठे यांचे वंशज साधारणतः दोनशे वर्षांपूर्वी 'वाटेगाव' या गावी स्थित झाले होते. इ.स.१८१८ ते १८७२ या कालावधीत अण्णा भाऊ साठे यांचे पणजोबा 'रघोबा' वाटेगावात राहत होते. 'सिधोजी' हे अण्णा भाऊंचे आजोबा १८६१ साली जन्मले १८८२ साली सिधोजीला भाऊ हा मुलगा झाला. त्यांच्या पत्नी वालुबाई या तळसंदे ता.हातकणंगले जि.कोल्हापूर येथील अण्णा कामा मांग यांच्या कन्या होत्या. यांचा विवाह १९१७ मध्ये झाला. त्यांना भागूबाई (१९१८), तुकाराम (१ ऑगस्ट १९२०), शंकर (१९२५) आणि जाईबाई (१९२७) अशी चार मुले त्यांना झाली होती. त्यापैकी तुकाराम उर्फ अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्यातील अजरामर कलाकृतींना जन्म देणारे ख्यातनाम साहित्यसम्राट होते. त्यांच्यासह त्यांच्या सर्व कुटुंबियांनी जातीयतेचे भयानक चटके सहन केले होते. अशा प्रतिकुल परिस्थितीतही अण्णा भाऊ साठे यांचे समाजकार्य व वाङ्मयीन कार्य विशिष्ट अशा उंचीवर विराजमान झाले होते.

<u>अण्णा भाऊ साठे यांचा जीवन प्रवास :-</u>

तुकाराम उर्फ अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव ता.वाळवा जि.सांगली (पूर्वीचा दक्षिण सातारा) येथे झाला. हा काळ भारतीय स्वातंत्र्य चळवळीने भारावलेला होता. अण्णा भाऊ साठे यांच्या जन्म विषयी विवेचन करताना डॉ.सदा कऱ्हाडे म्हणतात, "अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला १ ऑगस्ट १९२० रोजीचा, १ ऑगस्ट १९२० रोजी त्याच दिवशी राजकीय असंतोषाचे जनक मानल्या गेलेल्या लोकमान्य टिळकांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनाबरोबरच भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील टिळकयुग संपले."[1] यावरून अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मालाच क्रांतीमयतेचा परिसस्पर्श लाभलेला होता. त्यांचे सबंध जीवन वेगवेगळया क्रांतींनी भारावलेले होते.

अण्णा भाऊ साठे हे बालपणापासूनच कुशाग्र बुध्दिचे आणि खोडकर होते. डोंगरदऱ्यात, नद्यांच्या काठेने फिरणे, जंगलात भटकणे हे त्यांचे आवडीचे छंद होते. जंगलात भटकत असताना अनेक लोकगीते ते गात असायचे. मैदानी खेळ, दांडपट्टा चालवणे हा त्यांचा अत्यंत आवडीचा खेळ होता. त्यांचा स्वभाव अगदी धाडसी होता. कोणत्याही प्रसंगाला मोठ्या धाडसाने तोंड देण्याची त्यांची तयारी होती. त्यांच्या धाडसाविषयी प्रा.रमेश करडे म्हणतात, "अण्णा भाऊ आणि त्यांचा छोटा भाऊ शंकर यांनी मिळून 'होला' पकडण्यासाठी फास घातले. होल्याच्या घरट्यात अंडी होती. होला बाहेर गेलेला होता. परत येताच तो फाशात अडकणार होता. होल्याची वाट पाहत बसल्यावर त्या ठिकाणी होल्याऐवजी विषारी नागनीने येऊन अंडी गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला. अंड्याकडे जात असतानाच तो फासामध्ये अडकला. ते पाहून शंकर घाबरून गेला. अण्णा भाऊ मात्र सापाला पकडण्यासाठी सापाकडे जाऊ लागले. शंकरने अण्णा भाऊ यांना मनाई केली. अण्णा भाऊ यांनी त्यांना त्या जिवंत सापाला हाताने पकडून मांगवाड्यात आणले अन् ते त्या सापासोबत

ISBN : 978-93-88732-09-3

खेळू लागले."[२] ही त्यांची धाडसी वृत्ती त्यांच्यातील क्रांतीकारीत्वाचे दर्शन घडविते.

अण्णा भाऊ साठे यांना शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा होती पण त्यांच्या शाळेची गत शोकांतिकाच झाली. अण्णा भाऊंच्या वडिलांनी त्यांचे नाव शाळेत घातले. पाटी-पेन्सिल हे साहित्य घेऊन दिले. शिक्षकांनी अण्णा भाऊंना मुळाक्षरे काढून दिली. त्याच्या अभ्यास करण्यात पहिला दिवस निघून गेला. दुसऱ्या दिवशी मात्र अण्णा भाऊ अर्धा दिवसच शाळेत उपस्थित राहिले तो त्यांचा शैक्षणिक क्षेत्रातील शेवटचा दिवस ठरला. शिक्षकांनी केलेली शिक्षा एवढी भयानक होती की, अण्णा भाऊंचे बोटे बालवयात चेचून काढण्यात आली. ही शिक्षा अण्णाभाऊंच्या जिव्हारी लागली त्यामुळे त्यांनी दुपारच्या सुट्टीनंतर मास्तरच्या दिशेने दगड भिरकावून मारला आणि शिक्षणाला कायमचा रामराम ठोकला. आयुष्यभर अण्णा भाऊंनी पुन्हा शाळेचे तोंड कधीच पाहिले नाही. अण्णा भाऊंच्या शिक्षणाबाबत बहुविध मतप्रवाह समोर येतात. त्यापैकी महत्वाचे विवेचन प्रा.नरेंद्र पाटील करतात, "अण्णा भाऊ यांचे शिक्षण व्हर्नाक्युलर फायनल (इयत्ता ७ वी) पास पर्यंत झाले होते. अशी अनेकांची मते आहेत. वास्तविक परिस्थिती तर अशी आहे की, अण्णा भाऊ फक्त 'दीड दिवसच' शाळेत गेले. दीड दिवस यासाठी की चार-पाच दिवसांतल्या दीड दिवसातच गुरूजींनी त्यांच्याकरिता धुळपाटी दिली. परंतु ही धुळपाटी देऊन जेव्हा अण्णाला काहीच येत नाही असे दिसले, त्यावेळी हाताची बोटे सुजेपर्यंत तुकाराम उर्फ अण्णा भाऊला मार खावा लागला होता."[३] अशा प्रकारची भयानक स्थिती उद्भवली होती. त्यामुळे भाऊंनी शिक्षणाला कायमचा पूर्णविराम दिला होता.

अण्णा भाऊ साठे यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी महत्वाची घटना घडली. ती बापू साठे यांच्या तमाशात 'झिलकारी' म्हणून काम करत असताना क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले. त्यामुळे त्यांच्या आयुष्यात क्रांतीचे बीज रुजले गेले. त्यानंतर दुसरी महत्वाची घटना म्हणजे फकिराच्या विलक्षण बंडाचा प्रभाव त्यांच्यावर होत गेला. १९३४ ते १९३६ हा या काळातील दुष्काळ आणि ब्रिटिश सरकारची अमानुष दहशत यामुळे अण्णा भाऊंचे कुटुंब पोटासाठी कायमचे मुंबईला आले. वाटेगाव ते मुंबई हा प्रवास मजल दर मजल करीत पायी व रेल्वेने प्रवास करून त्यांनी मुंबई गाठली होती. प्रवास करीत असताना खूप मोठ्या अडथळ्यांची शर्यत त्यांनी पार पाडावी लागली होती. ही जीवनाविषयीची भयानक श्रध्दा बाळगणारे अण्णाभाऊंचे कुटुंब, आयुष्याच्या प्रत्येक पावलावर जगण्यासाठी कमालीचा संघर्ष करीत राहिले. आयुष्यभर वेगवेगळया आघाड्यांवर अण्णाभाऊंना पराजयाचा सामना करावा लागला. तरीही कधीही हार न मानता मोठ्या उम्मीदीने हा माणूस जीवनाशी दोन हात करत राहिला.

मुंबईसारख्या मायावी नगरीमध्ये वावरत असताना अण्णाभाऊंनी जगण्यासाठी प्रखर असा लढा दिला. गिरणी कामगारापासून ते सर्वच कामे त्यांनी केली होती. या काळात त्यांचा कामगार चळवळीशी संपर्क झाला. या चळवळीत काम करत असतानाही वेगवेगळे जातीय अनुभव पचवावे लागले. या चळवळीच्या प्रेरणेतूनच ते कम्युनिस्ट पार्टीत सामील झाले. या पार्टीतून भेटलेली साम्यवादाची शिकवणूक त्यांना आयुष्यभर प्रेरणा देत राहिली.

ISBN : 978-93-88732-09-3

अशा वेगवेगळया जडणघडणीतून अण्णा भाऊंचे जीवन आकार घेत होते. आपल्या हातून क्रांतीकारी काहीतरी घडले पहिजे. ही धडपड या माणसाने कायम ठेवली होती. 'लालबावटा कलापथक' त्यासाठीच त्यांनी स्थापन केले होते. महाराष्ट्रातील परिवर्तनाला प्रबोधनाच्या माध्यमातून जीवंत करण्यासाठी या कलापथकाची भूमिका महत्वाची होती. यासंदर्भात रमेश करडे म्हणतात, "लालबावटा कलापथक म्हणजे महाराष्ट्रातील क्रांतीयुगाची सुरूवात होती. ते एका विचाराचे संपूर्ण संघटन होते. 'महराष्ट्राला' वेड लावून क्रांतीची ठिणगी पेटवणारी एक धगधगती मशाल होती. अण्णा भाऊंसारखा साहित्यसूर्य आणि तीन क्रांतिसूर्याच्या धगधगत्या आगीतून पेरला जाणारा तेजोमय विचारप्रकाश म्हणजे 'लालबावटा' कलापथक होते."[४] या कलापथकाच्या माध्यमातून अण्णा भाऊंनी सवंध महाराष्ट्र प्रबोधनाच्या माध्यमातून पेटवण्याचे परिवर्तनमय काम केले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या उभारणीत अण्णा भाऊंचे योगदान भरीव स्वरूपाचे होते. संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे यासाठी अवघा महाराष्ट्र रस्त्यावर उतरला होता. या महाराष्ट्राच्या मनामनात क्रांतीची मशाल पेटवण्याचे काम अण्णा भाऊ साठे, अमर शेख आणि गव्हाणकर यांनी आपल्या प्रबोधनपर कार्यक्रमाच्या माध्यमातून केले. अण्णा भाऊंचे साहित्य हे प्रबोधनाबरोबरच साम्यवादाचा पुरस्कार करणारे होते. याची दखल घेत अण्णा भाऊंना रशियात सन्मानाने बोलवण्यात आले. रशियाला जात असतानाही अण्णा भाऊंना सोबत असलेल्या इतर साथीदारांकडून अवमान जनक वर्तणूकीचा अनुभव आला. ही उपेक्षा हा मोठा साहित्यिक आयुष्यभर सहन करीत राहिला. ही उपेक्षा त्यांना आपल्या देशातील जातीयव्यवस्थेने लादलेली होती. हे आपणास मान्य करावे लागेल. त्यांना रशियात गेल्यानंतर सामान्य माणसे पाहवयाची होती. झोपडपट्टीत राहणारे कामगार शेतकरी, दीन-दुबळे मंडळी यांचा अंदाज घ्यायचा होता. यातून त्यांची शेवटच्या वर्गातील माणसाविषयी कशी आपुलकी नाळ जोडली गेली होती, याचा वास्तवदर्शी प्रत्यय येत राहतो. अण्णा भाऊंच्या अगोदर त्यांचे साहित्य रशियात जाऊन पोहचले होते. तेथे त्यांच्या साहित्याचा चाहता वर्ग मोठा होता. हे अण्णा भाऊंचे आणि त्यांच्या साहित्याचे मोठेपण निदर्शनास येते. अण्णा भाऊंना अखेरच्या काळात खूप मोठे यातनामय जिणे जगावे लागले. ही आपल्या व्यवस्थेची शोकांतिकाच ठरते. त्यांच्यासारखा मोठा साहित्यिक आपल्या समाजाला समजू शकला नाही. त्यांचे आप्तस्वकीय मंडळी, शेजारचा परिसर, मित्रमंडळी या सर्वांकडून फसवणूकच झाली. कलापथकाचे विघटन, जवळच्या सहकाऱ्यांकडून अपमान, कौटुंबिक कलह, नातेवाईक-सहकारी-मित्र यांच्याकडून विश्वासघात, जयवंताबाईशी मतभेद, चित्रपट व्यवसायात फसवणूक, चिरागनगरच्या झोपडीतील एकटेपण, कोंडाबाईचा मृत्यू, आत्महत्येचा विचार, मृत्यूकडून-जीवनाकडे या सर्व उलथापालथी अण्णा भाऊ सारख्या महान लेखकाला संपवण्यासाठी कारणीभूत होत्या. अवतीभोवतीच्या जीवनवास्तवापासून त्यांनी स्वतःला अलिप्त करून घेतले होते. या एकाकीपणामुळे अस्वस्थतता आणखीनच वाढती होती. दुर्दम्य आशावाद उराशी बाळगून सर्वोच्च ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी प्रामाणिकपणाने आलेल्या प्रसंगाशी तोंड देत होते. पोटामध्ये अन्न नव्हते तरीही लेखन चालू

होते. समाजकल्याण मंत्री बाबुराव बारस्कर यांनी देऊ केलेले तीनशे रुपये मानधन एवढाच त्यांचा आधार होता. अण्णा भाऊंच्या आजारपणातही त्यांच्यासोबत कोणीच नव्हते. १८ जुलै १९६९ रात्री एका तुटक्या बाजेवर अण्णा भाऊंनी या जगाचा निरोप घेतला. असे दारूण जगणे हा साहित्यसम्राट जगत राहिला. शेवटच्या क्षणीही त्यांच्यासोबत कोणीच नव्हते. त्यांच्या मृत्युबाबत बाबुराव गुरव म्हणतात, "एका कुंद पावसाळ्यात दि.१८ जुलै १९६९ रोजी अण्णा भाऊ यांचे निधन झाले. अण्णा भाऊ यांच्याबरोबर नश्वर देहच नष्ट झाला असे नाही; तर मराठी सारस्वतातीतल एका उर्जस्वल प्रतिभेचाही अंत झाला. ही प्रतिभा गरिबांच्या जगण्यासाठी धडपडणारी, जीवन व्यवहारातील अनंत तगमगींना वाचा फोडणारी, मनुजवैरी समाजव्यवस्थेचे वाभाडे काढणारी होती. म्हणूनच अण्णा भाऊ यांच्या देहाचे नाही, तर ते अण्णा भाऊंबरोबर विलीन झालेल्या प्रतिभेचे आहे."[१] यावरून अण्णा भाऊंची प्रतिभा किती मोठी होती. ते व्यक्ती म्हणून व साहित्यिक म्हणून किती मोठे होते. याची साक्ष आपणास अशा असंख्य संदर्भातून भेटत होते.

**अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय :-**

मराठी साहित्यात अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य मैलाचा दगड ठरेल एवढ्या उंचीचे आहे. त्यांच्या साहित्य लेखनाची सुरूवात पोवाडे, लावण्या, किसान गीते, मजूरगीते, छक्कड, गण पदे आणि लोकनाट्य या बहुविध वाङ्मय प्रकारापासून झालेली होती. त्यामुळेत्यांच्या लेखानातून त्या परिसरातील सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक आणि राजकीय पट उलगडत जातो. अण्णा भाऊ साठे हे चिंतनशील आणि वास्तववादी मुशीतून लेखन करणारे साहित्यिक होते. त्यांच्या लेखनावर कमुनिस्ट विचाराचा प्रभाव होताच पण दीन-दुबळया आणि उपेक्षितांच्या जगण्याविषयी कमालीची आत्मियता होती. यातूनच त्यांचे लेखन आकार घेत होते. या नाकारल्या गेलेल्या माणसांच्या जगण्याला अण्णा भाऊंनी नायकत्व बहाल करून दिले होते. यासंदर्भात डॉ.सदा कऱ्हाडे म्हणतात, "वास्तव जीवनाच्या अनुभवातून मार्क्स, लेनिन यांच्या तत्त्व विचारातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वविचारातून, श्रमिकवर्गाच्यासंघर्षशीलचळवळीतूनदलितांच्या मुक्तिलढ्यातून, प्राचीन संत कवींपासून चळवळीतून, दलितांच्या मुक्तिलढ्यातून, प्राचीन संत कवींपासून अर्वाचिन केशवसुत, गडकरीपर्यंतच्या मराठी काव्यरंपरेतून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातून अण्णा भाऊ साठे यांनी मानवी मूल्ये, समाजमूल्ये, जीवनमूल्ये स्वीकारली. त्यांच्या संश्लेषणातूनअण्णा भाऊ साठे यांचे सर्जनशील कलावंत म्हणून स्वतःचे असे जीवनविषयक तत्त्वज्ञान सिध्द झाले. साहित्यनिर्मितिविषयक दृष्टिकोन आणि भूमिका निश्चित झाली."[६] यावरून अण्णा भाऊ साठे यांच्यात अंतर्भूत असलेल्या प्रतिभासंपन्न साहित्यिकाचे दर्शन तर घडतेच पण त्यांच्यातील कलावंत, कार्यकर्ता, समाजसुधारक या अंगावरही प्रकाश पडतो.

अण्णा भाऊ साठे हे मराठीतील सिध्दहस्त, प्रतिभासंपन्न आणि वास्तववादी लेखन करणारे साहित्यिक म्हणून लोकप्रिय झाले आहेत. वाङ्मयातील बहुविध वाङ्मय प्रकार त्यांनी विलक्षण ताकदीने हाताळले होते. त्यांनी ४९ वर्षाच्या अल्प आयुष्यात विपुल आणि अजोड अशी वाङ्मय निर्मिती केली. कथा, कादंबरी, नाट्यलेखन, प्रवासवर्णन, चित्रपटे, शाहिरी,

स्फुटलेखन आणि अन्यही साहित्य प्रकारात लेखन केले होते. या सर्वच साहित्य प्रकारातून त्यांनी सर्जनशील आणि उत्तमोत्तम साहित्य निर्माण केले. त्यांनी एकोणीस कथासंग्रह, तेहतीस कादंबऱ्या, चौदा लोकनाट्ये, दहा पोवाडे, तेरा गीत-पुस्तिका, सात चित्रपट कथा, एक प्रवासवर्णन, एक नाटक इत्यादी. त्यांच्या नावावर आज नव्वदच्या आसपास पुस्तके असलेली दिसतात. त्यांचे साहित्य जगातील आणि भारतातील सत्ताविसपेक्षा जास्त भाषांमधून भाषांतरीत झाले आहे.

कादंबरी हा वाङ्मय प्रकार अण्णा भाऊंनी अगदी दमदार पध्दतीने हाताळला होता. याचा वास्तवदर्शी प्रत्यय त्यांनी लिहलेल्या तेहतीस कादंबऱ्यावरून त्या येतो. अण्णा भाऊंनी कादंबरी ही पांढरपेशा वर्गातील कादंबरीकारांपेक्षा सर्वार्थाने वेगळी होती. ग्रामीण, दलित, झोपडपट्टी, आदिवासी, भटक्या आणि तळागाळातील माणसे त्यांनी कादंबरीच्या माध्यमातून जगाच्या समोर मांडली. 'वारणेच्या खोऱ्यात', 'फकिरा', 'वारणेचा वाघ', 'मास्तर', 'धुंद', 'अग्निदिव्य' इत्यादी कादंबऱ्या साहसाचे चित्रण करणाऱ्या आहेत. 'चित्रा', 'वैजयंता', 'चंदन', 'गुलपाखरू', 'रोहिणी', 'चिखलातील कमळ', 'आवडी', 'टिळा लाविते मी रक्ताचा', 'रत्ना' इत्यादी कादंबऱ्यातून स्त्रियांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. 'अलगूज', 'रानगंगा', 'अहंकार', 'रूप', 'आघात', 'गुलाम', 'मयुरा', 'संघर्ष' आणि 'मूर्ती' या कादंबऱ्यातून प्रेम आणि शृंगाराचे दर्शन घडवले आहे. 'माकडीचा माळ', 'वैर', 'डोळे मोडीत राधा चाले', 'रानबोका', 'कुरूप', 'पाझर', 'केवड्याचं कणीस' इत्यादी कादंबऱ्यामधून ग्रामीण पार्श्वभूमीचे साक्षेपी स्वरूप रेखाटले गेले आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून अन्याय, शोषण, पिळवणूक, विषमता यांना समर्थपणे आव्हान देण्यात आले. समता, मानवता, न्याय आणि आर्थिक समतोल टिकवण्यासाठी त्यांच्या कादंबऱ्यातील नायक, नायिका आणि व्यक्तिरेखा धडपडतात. बंडखोर, आदर्शवादी, लढाऊ, निःस्पृह, त्यागी आणि आत्मसमर्पणाच्या भूमिकेतून समाजाला दिशा देऊ पाहणारे पात्र हे त्यांच्या कादंबऱ्यातून साकार झालेली आहेत.

कथा वाङ्मयाच्या बाबतीतही अण्णा भाऊंचे योगदान तेवढेच मोलाचे आहे. ग्रामीण, दलित, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, विनोदी, शोकात्म, हृदयद्रावक, आत्मचरित्रात्मक गुन्हेगारी जीवन, अंधश्रध्दा निर्मुलन, प्रेम आणि कौटुंबिक असे बहुविध विषय त्यांच्या कथेच्या केंद्रस्थानी होते. अन्यायाच्या विरोधात दोन हात करण्यासाठी कणखरपणे उभे असणारे नायक हेच अण्णा भाऊंच्या कथेचे वेगळेपण ठरते. स्वाभिमान, शौर्य, साहस, त्याग, माणुसकी आणि बलिदान ही मूल्ये त्यांच्या कथेतून जन्माला येतात. 'खुळवाडी', 'बरबाद्या कंजारी' या कथासंग्रहातीलबहुसंख्य कथा या समाजव्यवस्थेतील भयंकर वास्तव रेखाटतात. 'अमृत', 'आबी', 'लाडी', 'कृष्णाकाठच्या कथा', 'गजाआड', 'गुऱ्हाळ', 'चिरागनगरची भुतं', 'ठासलेल्या बंदुका', 'नवती', 'निखारा', 'पिसाळलेला माणूस', 'फरारी', 'भानामती', 'भूतांचा मळा', 'मास्तर', 'सनगा', 'रानवेली', 'राम-रावण युध्द', 'स्वप्नसुंदरी' इत्यादी कथासंग्रहामधून एकुणच समाजाचे वास्तवदर्शी चित्र अण्णा भाऊंनी रेखाटले आहे.

लोकनाट्ये, नाटके, नाटिका, पोवाडे, लावणी, शाहिरी, गण, गौळण, गोंधळ, कटाव, झगडा,

ISBN : 978-93-88732-09-3

छक्कड गीते, कविता, वार्तापत्रे, मुलाखती भाषणे, स्तंभलेखन चित्रपट परीक्षणे, त्यांच्या कादंबऱ्यावरील चित्रपट इत्यादी साहित्य प्रकारातून अण्णा भाऊंनी लेखन केले. कामकरी, शेतकरी, दीन-दलित यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडणारे अण्णा भाऊंचे साहित्य आहे. 'अकलेची गोष्ट', 'शेटजीचं इलेक्शन', 'खापऱ्या चोर', 'देशभक्त घोटाळे', 'निवडणुकीत घोटाळे', 'बेकायदेशीर', 'माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची', 'मूक मिरवणूक', 'नवे तमाशे', 'पुढारी मिळाला', 'लोकमंत्र्याचा दौरा', 'इनामदार', 'बिलंदर बुडवे', 'दुष्काळात तेरावा', 'पेंग्याचं लगीन' इत्यादी लोकनाटके, नाटके व नाटिका या वाङ्मयातून समाजातील वृत्ती-प्रवृत्तीचा वेध अण्णा भाऊंनी घेतला आहे. 'नानकिंग नगरीपुढे', 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा', 'बंगालची हाक', 'बर्लिनचा पोवाडा', 'वजाबाईचा दंगा', 'तेलंगाचा संग्राम', 'महाराष्ट्राची परंपरा', 'अंमळनेरचे अमर हुतात्मे', 'मुंबईचा कामगार', 'काळ्या बाजाराचा पोवाडा' या पोवाड्यातून त्यांनी प्रतिमा, प्रतिके, उदात्त मूल्ये यांची खंबीरपणाने मांडणी केली आहे. 'मुगी', 'मुंबईची लावणी', 'माझी मैना' या लावण्यातून ग्रामीण परिसर, मुंबई महानगर आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यावर साक्षेची विवेचन केले आहे. 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन रशियात फिरत असताना तेथील ऐश्वर्याबरोबरच दारिद्र्याचा शोध घेणारी उत्तमकलाकृतीआहे. अण्णाभाऊंच्यासाहित्यातीलसंवाद, वातावरण निर्मिती, प्रतिभासंपन्नता ही त्यांच्या एकुणच साहित्याची उंची वाढवणारे आहेत. अशा प्रकार अण्णा भाऊंच्या समग्र वाङ्मयावर संक्षिप्तपणे आपणास प्रकाश टाकता येतो.

## समारोपः-

अण्णा भाऊ साठे यांचे बालपण सातारा वाटेगाव व तेथील वारणा खोरे, दऱ्या डोंगरात गेले. वाटेगावपासून मुंबईपर्यंतचा प्रवास आपल्या कुटुंबियांसोबत करत असताना सहन करावी लागलेली ससेहोलपट भयानक होती. मुंबईत स्थित झाल्यावर कामगार चळवळ, लालबावटा कलापथक व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून देवून काम केले. रशियाचा यशस्वी दौरा या दरम्यानच त्यांनी पूर्ण केला. अण्णा भाऊंनी कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, वगनाट्य, पटकथा, पोवाडे, गीते आणि अन्य वाङ्मय प्रकारात विपुल लेखन केले. त्यांचा एकुणच जीवनप्रवास हा खडतर आणि कष्टप्रद होता हेच प्रकर्षाने दिसून येते.

## संदर्भ सूची :-


१. सदा कऱ्हाडे, अण्णा भाऊ साठे :व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, २००९, पृ.क्र.०८

२. रमेश करडे, बहुजननायक अण्णा भाऊ साठे, मुक्तरंग प्रकाशन, लातूर, पहिली आवृत्ती, २००७ पृ.क्र.२५

३. नरेंद्र पाटील, लोकशाहीर अण्णा भाऊ (शिक्षण संक्रमण अंक), भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९९३, पृ.क्र.१०

४. रमेश करडे, उनि., पृ.क्र.५३

५. बुराव गुरव, अण्णा भाऊ साठे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती, २००५,

छक्कड गीते, कविता, वार्तापत्रे, मुलाखती भाषणे, स्तंभलेखन चित्रपट परीक्षणे, त्यांच्या कादंबऱ्यावरील चित्रपट इत्यादी साहित्य प्रकारातून अण्णा भाऊंनी लेखन केले. कष्टकरी, शेतकरी, दीन-दलित यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडणारे अण्णा भाऊंचे साहित्य आहे. 'अकलेची गोष्ट', 'शेटजीचं इलेक्शन', 'खापऱ्या चोर', 'देशभक्त घोटाळे', 'निवडणुकीत घोटाळे', 'बेकायदेशीर', 'माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची', 'मूक मिरवणूक', 'नवे तमाशे', 'पुढारी मिळाला', 'लोकमंत्र्याचा दौरा', 'इनामदार', 'बिलंदर बुडवे', 'दुष्काळात तेरावा', 'पेंग्याचं लगीन' इत्यादी लोकनाटके, नाटके व नाटिका या वाङ्मयातून समाजातील वृत्ती-प्रवृत्तीचा वेध अण्णा भाऊंनी घेतला आहे. 'नानकिंग नगरीपुढे', 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा', 'बंगालची हाक', 'बर्लिनचा पोवाडा', 'बजावाईचा दंगा', 'तेलंगाचा संग्राम', 'महाराष्ट्राची परंपरा', 'अंमळनेरचे अमर हुतात्मे', 'मुंबईचा कामगार', 'काळ्या बाजाराचा पोवाडा' या पोवाड्यातून त्यांनी प्रतिमा, प्रतिके, उदात्त मूल्ये यांची खंबीरपणाने मांडणी केली आहे. 'सुगी', 'मुंबईची लावणी', 'माझी मैना' या लावण्यातून ग्रामीण परिसर, मुंबई महानगर आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यावर साक्षेची विवेचन केले आहे. 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन रशियात फिरत असताना तेथील ऐश्वर्याबरोबरच दारिद्र्याचा शोध घेणारी उत्तमकलाकृतीआहे. अण्णाभाऊंच्यासाहित्यातीलसंवाद, वातावरण निर्मिती, प्रतिभासंपन्नता ही त्यांच्या एकुणच साहित्याची उंची वाढवणारे आहेत. अशा प्रकार अण्णा भाऊंच्या समग्र वाङ्मयावर संक्षिप्तपणे आपणास प्रकाश टाकता येतो.

समारोपः-

अण्णा भाऊ साठे यांचे बालपण सातारा वाटेगाव व तेथील वारणा खोरे, दऱ्या डोंगरात गेले. वाटेगावपासून मुंबईपर्यंतचा प्रवास आपल्या कुटुंबियांसोबत करत असताना सहन करावी लागलेली ससेहोलपट भयानक होती. मुंबईत स्थित झाल्यावर कामगार चळवळ, लालबावटा कलापथक व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून देवून काम केले. रशियाचा यशस्वी दौरा या दरम्यानच त्यांनी पूर्ण केला. अण्णा भाऊंनी कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, वगनाट्य, पटकथा, पोवाडे, गीते आणि अन्य वाङ्मय प्रकारात विपुल लेखन केले. त्यांचा एकुणच जीवनप्रवास हा खडतर आणि कष्टप्रद होता हेच प्रकर्षाने दिसून येते.

संदर्भ सूची :-


१. सदा कऱ्हाडे, अण्णा भाऊ साठे :व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, २००९, पृ.क्र.०८

२. रमेश करडे, बहुजननायक अण्णा भाऊ साठे, मुक्तरंग प्रकाशन, लातूर, पहिली आवृत्ती, २००७ पृ.क्र.२५

३. नरेंद्र पाटील, लोकशाहीर अण्णा भाऊ (शिक्षण संक्रमण अंक), भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९९३, पृ.क्र.१०

४. रमेश करडे, उनि., पृ.क्र.५३

५. बुराव गुरव, अण्णा भाऊ साठे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती, २००५,